

# असीमित उर्जेस मदत

## ग्रामीण महिला व भावी ग्रामीण पिढीच्या
## विकासाचा एक शोध

ग्रामीण विकासात बँक ऑफ महाराष्ट्रचा आत्मगौरव


**ग्रामीण महिला व बाल विकास मंडळ, पुणे**

ग्रामीण विकास केन्द्र,

जनमंगल, हडपसर औद्योगिक वसाहत, हडपसर, पुणे ४११०१३

टेलिफोन : ०२०-२६८१४८४६/२६८७०८१५




येवला जिल्हा नाशिक येथील पैठणीचे पारंपारिक विणकरांचे कौतुक करताना
आदरणीय अध्यक्ष व प्रबंध संचालक श्री. ॲलेन पिरेरा

## ग्रामीण महिला व बालक विकास मंडळ

भारतात स्त्री ही माता, भगिनी व पत्नी या तिच्या भूमिकांत पूज्य आहे. ती कुटुंबांस एकत्र ठेवणारी केन्द्र शक्ती असून मोठ्यांच्या व मुलांच्या गरजांकडे समानतेने पाहणारी आहे.

परंतु पुरूष साथीदाराप्रमाणे शिक्षणाच्या आणि रोजगाराच्या संधी ज्यांना उपलब्ध आहेत अशा शहरातील स्त्रियां व ग्रामीण व शहरी क्षेत्रातील गरीब, दुर्बल वर्गातील स्त्रियां, यांच्यात खूप विषमता आहे.

वर्ष १९८९ मध्ये बँक ऑफ महाराष्ट्र आणि राष्ट्रीय बँकिंग प्रबंधन संस्थान (एन आय बी एम) च्या स्वप्न द्रष्टयांनी एकत्र येऊन, गरीबात गरीब, औपचारिक शिक्षण न घेतलेल्या परंतु कुटुंब व पशुधन सांभाळण्याची, सण साजरे करण्याची, विविध पाककृती करण्याची आणि ऋतुमानाप्रमाणे लोणची, पापड करण्याची प्रचंड क्षमता असलेल्या, परंतु शेतमजूर म्हणून काम करणाऱ्या ग्रामीण महिलांना मदत करण्याचे ठरविले.

ग्रामीण क्षेत्रातील महिलांचा सामाजिक, आर्थिक आणि आरोग्याचा स्तर सुधारण्यासाठी जून १९८९ मध्ये बँक ऑफ महाराष्ट्रने ग्रामीण महिला व बाल विकास मंडळ नावाचा ट्रस्ट स्थापन केला. ट्रस्ट जीएमबीव्हीएम (GMBVM) या नावाने ओळखला जातो. ट्रस्टने महिलांचा सर्वांगीण व व्यापक विकास व त्यांचे सशक्तीकरण करण्याचे लक्ष्य समोर ठेवले. स्वसहायता गटाच्या माध्यमातून त्यांना संघटित केले व अर्थार्जनाची कामे हाती घेण्यास त्यांना मदत करण्याचे ठरविले.



स्वसहायता गटाच्या उत्पादनांचे लोकमंगल येथे आयोजित प्रदर्शनाचे निरीक्षण करताना कार्यकारी संचालक श्री.एम.जी.संघवी



महान प्रतिष्ठित प्रो. मोहम्मद युनूस आणि केंद्रीय कृषिमंत्री श्री शरद पवार यांनी सावित्री बचत गटाच्या विक्री केन्द्रास भेट दिली. श्री. आर. हरीकुमार, सहायक महाव्यवस्थापक, अग्रणी बँक योजना, ग्रामीण बँक, मार्डेफ व एफ.आय. यांनी स्वसहायता गटाची उत्पादने त्यांना दाखविली.

### ट्रस्ट यांसाठी कार्यरत आहे

१) महिलांना त्यांचे स्व-सहायता गट तयार करण्यास मदत करणे.

२) स्वत:च्या पैशाची बचत करणे, गटाच्या स्त्रोतांची आपसात वाटणी करणे व ग्रामीण सावकाराच्या पाशापासून दूर ठेवणे.

३) स्वावलंबन व स्वतंत्र विचार करणे, लोकशाही पध्दतीने सामूहिक निर्णय घेणे.

४) त्यांचा आत्मविश्वास, आत्मसम्मान आणि स्व- योग्यता वाढविणे.

५) त्यांनी केलेली बचत त्यांच्या छोट्या-छोट्या गरजांसाठी वापरणे. सर्वात महत्त्वाचे स्वत:च्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी अर्थोपार्जनाचे कार्य हाती घेण्याची सुरूवात करणे.

ट्रस्ट महाराष्ट्रातील ९ जिल्ह्यात १९९०० पेक्षा जास्त स्व-सहायता गटांचे पोषण करीत आहे. ग्रामीण व शहरी क्षेत्रातील दारिद्रय रेषेच्या खालील आणि दारिद्रय रेषेवरील, दोन्ही वर्गातील स्व-सहायता गटांच्या महिलांना, ग्रामीण व गरीब लोकांकरीता त्यांच्या अनेक विकासाच्या योजनांना ट्रस्ट मदत करीत आहे.

९ जिल्हे याप्रमाणे आहेत.... बँक ऑफ महाराष्ट्रचे ६ अग्रणी जिल्हे ....पुणे, सातारा, ठाणे, जालना, नाशिक, औरंगाबाद व उर्वरित ३ जिल्हे.... सोलापूर, कोल्हापूर व अहमदनगर.

१९८९ मध्ये यूनिसेफची मदत जीएमबीव्हीएम ला लाभली व ट्रस्टनी डॉक्रा संशोधन प्रकल्पाच्या अंमलबजावणीने काम सुरू झाले. ही योजना प्रथम २ वर्षात ता. वेल्हे जि.पुणे येथे राबविण्यात आली नंतर दौंड, इंदापूर व खेड खंडात (ब्लॉक) राबविण्यात आली. ग्रामीण महिला व बालक विकास मंडळाच्या कार्यापासून स्फूर्ती घेऊन १९९४ ला पुणे जिल्ह्यात महाराष्ट्र ग्रामीण क्रेडीट प्रकल्पाची सुरूवात करण्यात आली.




जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे व ग्रामीण महिला व बालक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने चालविलेले सावित्री विक्री केंद्र.



पुणे येथील कपडे तयार करणारे स्वसहायता गटाचे केन्द्र

जीएमबीव्हीएमने महाराष्ट्र ग्रामीण क्रेडीट प्रकल्प प्रथम चरणात पुणे जिल्ह्यातील ११ खंडात (ब्लॉक) आणि द्वितीय चरणात ठाणे जिल्ह्यातील २ खंडात १९९९ ते २००२ या कालावधीत कार्यान्वित केला. ५०६ स्वसहायता गटांचे वित्तपोषण करण्यात आले. त्यापैकी ४५३ स्व–सहायता गटांना पुणे व ठाणे जिल्ह्यातील विभिन्न राष्ट्रीयीकृत बँकांच्या शाखांकडून वित्त पुरवठा झाला होता. बँक ऑफ महाराष्ट्रच्या औरंगाबाद सोडून इतर ५ अग्रणी जिल्ह्यात जीएमबीव्हीएमने १९९०० पेक्षा जास्त स्वसहायता गट स्थापित केले असून १६३०९ स्वसहायता गटांना वित्त पुरवठा (क्रेडीट लिंक) करण्यात आला व रू. ३३६५.१५ लाखाचे कर्ज देण्यात आले.

## खालील ३ योजनांतर्गत स्वसहायता गट स्थापित करण्यात आले.

१) दारिद्रय रेषेखालील स्वसहायता गटांसाठी स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना
२) कार्यावर आधारित नाबार्ड ची मदत या योजने अंतर्गत स्वसहायता गटांना बँक–वित्त–संलग्नता (लिंकेज)
३) स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेशिवाय स्वसहायता गटांना बँक–वित्त–संलग्नता (लिंकेज)

## जीएमबीव्हीएमची महत्त्वाची कार्यक्षेत्रे

१) स्व सहायता गटाची स्थापना, पोषण आणि क्षमता निर्माण करणे, त्यांचे बचत खाते उघडणे, बँकेशी वित्त–संलग्नता स्थापित करण्यासाठी गटांना प्रशिक्षित करणे.

२) रिसर्च इन कम्युनिटी हेल्थ, बिगर सरकारी संघटना (एनजीओ) आणि डॉक्टर यांच्या सहकार्याने स्वसहायता गटाच्या सदस्यांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे. गटाच्या सदस्यांसाठी ट्रस्टने खालील गोष्टी केल्या आहेत – त्यांचे रक्तगट्र तपासणे, आरोग्य आणि डोळे तपासणी शिबीर आयोजित करणे, शौचालय बांधणे इ.



स्वसहायता गटाद्वारे उत्पादित गुणवत्तापूर्ण सेंद्रीय भाजीपाला पाहून अध्यक्ष व प्रबंध संचालक प्रभावित झाले.





जर्मनीच्या चँसलर हर एक्सलेन्सी अँजेला (Chanceller, Her Excellency Angela Merkel) दौंडच्या वैष्णवी स्वसहायता गटाशी चर्चा करताना (डावीकडे)
गणेश मूर्तीच्या स्टॉलचे निरीक्षण करताना मुख्य कार्यकारी अधिकारी, मेटको, सौ. माधुरी कुलकर्णी, व जीएमबीव्हीएमच्या सचिव सौ. रत्ना गणपती (उजवीकडे)



अध्यक्ष व प्रबंध संचालक श्री. अॅलेन परेरा, स्वसहायता गटाच्या मालाचे कौतुक करताना

३) शिक्षण – स्वसहायता गटाच्या प्रत्येक सदस्याला अंकगणिताचे, तसेच छोटी–छोटी वाक्ये वाचता यावीत आणि कोणत्याही सदस्यास कागदपत्राचे प्रमाणीकरण करण्याकरता आपला निशाणी अंगठा द्यावा लागू नये यासाठी स्थानिक भाषेचे ज्ञान दिले जाते. शैक्षणिक मध्यस्थीचा भाग म्हणून बऱ्याच खेड्यांतून प्रौढ साक्षरता वर्ग चालविले जातात.

४) स्वसहायता गटाच्या कार्याबद्दल प्रशिक्षण – अर्थात स्वसहायता गटाचे हिशोब ठेवणे, चांगल्या स्वसहायता गटाच्या कार्यासाठी नियम व पध्दती, सदस्यांची जबाबदारी, बँकेशी वित्त/ऋण – संलग्नतेसाठी स्वसहायता गटाची आवश्यक श्रेणी प्राप्त करणे याबाबत प्रशिक्षण दिले जाते.

कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण –

१) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ठाणे (डीआरडीए)

२) स्वर्ण जयंती स्वरोजगार योजने अंतर्गत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे

३) I.F.A.D. च्या मदतीने तेजस्विनी योजना राबविणारे महिला आर्थिक विकास महामंडळ, या संस्थांनी जीएमबीव्हीएमला अर्थार्जनाच्या विविध कार्याचे उत्तम प्रशिक्षण देणारी संस्था म्हणून मान्यता दिली आहे.

५) विमा – स्वसहायता गटाच्या सदस्यांसाठी अपघातविमा, वैद्यकीयविमा आणि जीवनविमा यांचे संरक्षण मिळविणे.

६) कायद्याची मदत – जीएमबीव्हीएम कायदे विषयक मदत आणि समुपदेशन केन्द्र इंदापूर येथे चालविते. स्वसहायता गटाच्या सदस्यांना महिला विषयीच्या कायद्याचे ज्ञान दिले जाते. तसेच परिवारातील सदस्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी समुपदेशन केले जाते.

७) पणन सेवा – स्वसहायता गटाचे सदस्य, महिला उद्योजिका आणि ग्रामीण शिल्पकार यांच्या उत्पादनांसाठी पणन सेवा दिली जाते.

## ८) स्वसहायता गटाचा स्तर ऊंचावून त्यांना लघू व सूक्ष्म उद्यमी बनविणे

स्वसहायता गटांच्या सदस्यांना जीएमबीव्हीएमद्वारे पणन सेवा देण्याचा एक भाग म्हणून जीएमबीव्हीएम पुण्यात दोन ठिकाणी केन्द्र चालविते – मार्केट यार्ड मध्ये सावित्री व मॉडेल कॉलनीत सावित्री. स्वसहायता गटाचे सदस्य, महिला उद्यमी आणि ग्रामीण शिल्पकार आपले उत्पादन केन्द्रांना देऊ शकतात. नाबार्ड व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या माध्यमातून दिल्ली, मुंबई व जयपूर येथे आयोजित प्रदर्शनात जीएमबीव्हीएम स्वसहायता गटाच्या सदस्यांचा माल पाठवित असते.

स्वसहायता गटाचे लघु व सूक्ष्म उद्यमीत परिवर्तन करण्यासाठी जीएमबीव्हीएमने ३ नवे उपक्रम सुरू केले आहेत. हे उपक्रम स्थिरता प्राप्त करण्याच्या अवस्थेत आहेत.

१) कपडे तयार करण्याचे केन्द्र – शेवाळेवाडी, ता. हवेली. जि. पुणे येथे
२) फाईल व लिफाफे तयार करण्याचे केन्द्र – हिंजेवाडी ता. मुळशी आणि भिगवण ता. इंदापुर जि. पुणे येथे
३) पोळ्या तयार करण्याचे केन्द्र – उद्योग व भोजन प्रबंधकांना पोळ्यांचा पुरवठा करणे

याशिवाय अ) खुटबाव ता. दौंड येथील अंबिका महिला बचत गटाने बिग–बझारच्या मॉल्सना तयार मसाले पुरविण्याचे कार्य हाती घेतले आहे. ब) सोमाटणे फाटा ता. मावळ येथील प्रतिभा महिला गटाने मातीची भांडी तयार करण्याचे केन्द्र सुरू केले आहे. क) कुंभारवाडीचा कानिफनाथ स्वसहायता गट गणपतीच्या मूर्ती तयार करण्याचे कार्य करतो. ड) मावळचा महालक्ष्मी बचत गट हात–सडीचे तांदळाचे उत्पादन करून मावळ सम्राट या ब्रँड नावाने विकतो. या काही यशस्वी गाथा आहेत.

### आणि काही बहुमान / गौरव

जेव्हा असे महाकाय व महत्त्वाचे कार्य आंतरिक तळमळीने व उत्साहाने केले जाते तेव्हा मानमान्यता आणि बहुमान मिळायलाच हवेत. स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजने अंतर्गत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल जीएमबीव्हीएम वर्ष २००१ ते २००५ चे मुख्य कार्यकारी – अधिकारी – जिल्हापरिषद – प्रमाणपत्र राज्य पालक मंत्र्याच्या हस्ते प्राप्त झाले.

बिगर सरकारी संघटनेने स्वसहायता गटांशी बँकांशी वित्त पुरवठा संलग्नता स्थापित करण्याच्या उत्कृष्ट कार्याची वर्ष २००४–०५, २००५–०६. २००६–०७, २००७–०८ ची प्रथम क्रमांकाची राज्य स्तरीय ट्रॉफी मिळाली आहे.



नाबार्डचा बिगर सरकारी संघटना राज्य स्तरीय अँवार्ड (२००७–०८) स्वीकारताना श्री. आर हरिकुमार व श्रीमती रत्ना गणपती.



गणेश उत्सवाचे काही क्षण श्री. बी. के. महाजन महा व्यवस्थापक दीप प्रज्वलित करताना. अध्यक्ष व प्रबंध संचालक श्री. ॲलेन परेरा या कार्यक्रमात सहभागी होताना



पिरंगुट, पुणे येथे समारंभात सहभागी झालेले स्वसहायता गटाचे सदस्य

पुणे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने या ट्रस्टला मातृ – बिगर सरकारी संघटना हा बहुमान वर्ष २००३ पासून दिला आहे.

ग्रामीण महिला व बाल विकास मंडळाचे (जीएमबीव्हीएम) विश्वस्त (ट्रस्टी) बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यपालक आणि अधिकारी आहेत. त्यांचे अनुभव व मार्गदर्शन ट्रस्टला सदैव उपलब्ध असते.

## विश्वस्त मंडळ (ट्रस्टी) :–

महाव्यवस्थापक, आयोजना – अध्यक्ष
उप महाव्यवस्थापक, कृषी, अन्य प्राथमिकता – सदस्य
सहा. महाव्यवस्थापक, पुणे ग्रामीण क्षेत्र – सदस्य
सहा–महाव्यवस्थापक, एल. बी. एस., आर.आर.बी, मार्डेफ – सदस्य
मुख्य कार्यकारी अधिकारी – मेटको – पुणे कार्यकारी विश्वस्त
समन्वयक, ग्रामीण विकास केंद्र, हडपसर – सदस्य
वरिष्ठ व्यवस्थापक, जीएमबीव्हीएम – सदस्य सचिव



स्वसहायता समुहास दिल्या जाणाऱ्या दुग्ध प्रक्रिया व दुग्ध जन्य पदार्थ प्रशिक्षणाचे निरीक्षण करताना बँक ऑफ महाराष्ट्रचे महाव्यवस्थापक व जीएमबीव्हीएमचे अध्यक्ष श्री. व्ही. कन्नन.



घोटावडे, पुणे येथे स्वर्ण जयंती स्वरोजगार योजनेत अंतर्गत इमू फार्म व आयएफएडी टीम.



स्वसहायता गटाचे सदस्य भावी योजनेवर चर्चा करताना.


ग्रामीण विकासात बँक ऑफ महाराष्ट्रचा आत्मगौरव

ग्रामीण महिला व बाल विकास मंडळ, पुणे

ग्रामीण विकास केंद्र



जनमंगल, हडपसर औद्यो. वसाहत, हडपसर, पुणे ४११०१३

टेलिफोन : ०२०-२६८१४८४६/२६८७०८१५